PDF Compressor Free Version

ISSN 2277- 8063 (Print)
June-2020
Vol. IX / Issue.II / 2020
Impact Factor - 6.013

# Navjyot

नवज्योत

## International Interdisciplinary Research Journal [ Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management]

*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*Indexed by:*

IIJIF iiJS Cosmos Scientific Journal Impact Factor TOGETHER WE REACH THE GOAL

**Chief Editor**
**Prof. Dr. Ravindra P. Bhanage**
Head, Dept. of Political Science,
Shivaji University,
Kolhapur.

*- Published by-*
**HOUSA Publication, Kolhapur.**

*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*
*Navjyot / Vol. IX / Issue – II* ISSN 2277-8C


| | | | |
|---|---|---|---|
| 26. | करोनाचा भारतीय राजकीय व्यवस्थेवर होणारा परिणाम | प्रा.डॉ.मनिष सोनवणे | 112- |
| 27. | कोरोना विषाणू आणि जागतिक परिणाम | प्रा. नितीन माणिकराव बिहाडे | 116- |
| 28. | कोरोना विषाणू आणि आंतरराष्ट्रीय राजकारण | प्रा.बाळासाहेब बजरंग सरगर | 119- |
| 29. | भारत, कोरोना वायरस आणि पंडित नेहरूंचे शांततामय सहजीवन तत्वाची उपयुक्तता | प्रा. सचिन ताराचंद धुर्वे | 121- |
| 30. | शासनाचे आरोग्य धोरण व सामाजिक-राजकीय जनजागृति (विशेष संदर्भ-कोरोना वायरस महामारी) | श्री. विरेंद्र मुरलीधर घरडे | 124- |
| 31. | कोव्हिड-१९ आंतरराष्ट्रीय राजकारण व संघटनेचे बदलते स्वरूप | अक्षय विजय सपकाळे | 126- |
| 32. | कोरोनाचे आंतरराष्ट्रीय परिणाम | कु. देशमुख पौर्णिमा लक्ष्मण | 130- |
| 33. | कोरोनाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या परिणामांचे अध्ययन | सोनाली मधुकर जाधव | 134- |
| | **भारतातील नव सामजिक चळवळ** | | |
| 34. | भारतीय स्त्रीवादी चळवळ | डॉ.सौ. उर्मिला महेश चव्हाण | 139- |
| 35. | डॉ.बाबासाहेब आणि स्त्रियांचे सक्षमीकरणाची चळवळ | प्रा.डॉ.एस.के.खडसे | 145- |
| 36. | महाराष्ट्रातील स्त्री चळवळ सद्यपरीस्थीतीचे स्वरूप | प्रा.डॉ.विलास भारतराव बनसोडे | 149- |
| 37. | स्वतंत्र विदर्भ राज्य चळवळ (विशेष संदर्भ–लहान राज्याची मागणी ) | डॉ.सौ.ममता व्ही.पाथ्रीकर डॉ.मनीषा यादव | 152- |
| 38. | स्वतंत्र विदर्भ चळवळ | डॉ.प्रा.सौ.मेघा संजय पाटील | 155- |
| 39. | भारतातील स्त्रीवादी चळवळ | प्रा.डॉ.संजय पंढरीनाथ गायकवाड | 161- |
| 40. | स्त्री मुक्ती संघर्ष चळवळ | प्रा.डॉ. सुरेश गंगाराम कुंभार | 165- |
| 41. | भारतातील शेतकरी चळवळ | डॉ.दत्तात्रय चंद्रकांत वाबळे | 172- |
| 42. | स्त्रीवादी चळवळ : समता प्रस्थापित करण्यात मोलाची भूमिका | डॉ.संदीप बी.नेरकर | 175- |
| 43. | स्त्रीवादी चळवळ | प्रा.भुसारे मधुचंद्र लक्ष्मण | 180- |
| 44. | स्त्रियांवरील अत्याचार आणि निग्रभ संवैधानिक अधिनियम | सौ.उषादेवी अंकुश कांबळे | 182- |
| 45. | स्त्री-सक्षमीकरण व शेतकरी संघटना : एक विश्लेषणात्मक अध्ययन | प्रा.रणदिवे टी.वाय | 186- |
| 46. | स्त्री सक्षमीकरणात महिला संघटनांचे योगदान : विशेष संदर्भ सातारा जिल्हा | प्रा.सकटे छाया भारत | 189- |
| 47. | स्वतंत्र विदर्भ चळवळ | प्रा.सुनिता रामधन गवई | 194 |
| 48. | भारतातील नव –सामाजिक चळवळी – शेतकरी चळवळ | श्री.अक्षय अरुण बच्छाव | 196 |
| 49. | विज्ञानवादी चळवळ – महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ | प्रा.श्रीमती दमयंती नलवडे | 200 |
| 50. | महिलांचा राजकीय सहभाग | डॉ.संगीता जी. भांगडिया (मालानी) | 202 |
| 51. | जागतिकीकरण आणि महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ : एक ऐतिहासिक रूपरेषा | प्रा.सचिन अशोक धेंडे | 206 |
| 52. | शेतकरी विकासातील मा.शरद पवार यांचे योगदान | श्री.सोमनाथ भानुदास जाधव | 210 |

PDF Compressor Free Version

*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. IX / Issue – II* *ISSN 2277-8063*

# स्त्री मुक्ती संघर्ष चळवळ

**प्रा. डॉ. सुरेश गंगाराम कुंभार**

राज्यशास्त्र विभाग राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध

**प्रास्ताविक :**

कोणत्याही समाजाची सांस्कृतिक पातळी ही त्या समाजातील स्त्रीयांची स्थिती कशी आहे यावरून ठरते. भारतात वेदकालीन व वेदोत्तर काळात समाजात स्त्रीयांचा दर्जा उच्च होता मात्र धर्मशास्त्र काळात व तिथून पुढे प्रबोधन काळापर्यंत स्त्रीयांचा दर्जा खालावलेला दिसतो. खऱ्या अर्थाने स्त्री प्रबोधनाला सुरूवात युरोपात झाली. माणूस हा जन्मतः स्वतंत्र आहे. पुरुषांबरोबर स्त्रीयांनाही त्यांचे मूलभूत हक्क मिळाले पाहिजेत असा विचार पुढे आला. जे. एस. मिल, लॉक, रुसो, व्हॉल्टेअर यांच्या वैचारिक पायावर जगात लोकशाही व्यवस्थेची पायाभरणी झाली खरी पण त्याचा प्रत्यक्ष लाभ स्त्रीयांना झाला नाही.

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीचे स्थान नेहमी दुय्यम दर्जाचे राहिले आहे. तिला शिक्षणाची संधीही मिळू दिली नाही. परिणामे शतकानुशतके स्त्री ही पुरुषप्रधान मानसिकतेची बळी ठरली. स्त्री आणि पुरुष या संकल्पना समाजनिर्मित आहेत. "स्त्री ही स्त्री म्हणून जन्माला येत नाही ती स्त्री म्हणून घडविली जाते", हे सिमॉन द बोव्हुआर यांचे विधान सुप्रसिद्ध आहे.

स्त्रीयांच्या म्हणून काही समस्या अनेक वर्षांपासून आहेत. उदा. हुंडापद्धती, बालविवाह, विधवा, कुमारीमाता, परित्यक्ता इ. हे प्रश्न तेव्हाही होते आणि आजही आहेत. जरी सामाजिक संदर्भ बदलले तरी स्त्री प्रश्नाची तिव्रता कमी होताना दिसत नाही.

समाजात होणारे स्त्रीयांचे सर्वकष शोषण व त्यांचे माणूस म्हणून नाकारलेले अधिकार यांचा परिणाम म्हणून स्त्री प्रश्नाकडे लक्ष वेधण्यास युनोने प्राधान्य दिले आणि १९७५ हे जागतिक महिला वर्ष साजरे केले. जागतिक संघटनेने स्त्री प्रश्नामध्ये लक्ष घातल्याने स्त्रीप्रश्न ऐरणीवर आला.

**भारतीय समाज सुधारकांचे स्त्री सुधारणेविषयी योगदान :**

इंग्रजी शिक्षण, इंग्रजी वाङ्मय व पाश्चात्य संस्कृती यांचा परिचय झालेल्या मूठभर सुशिक्षितांनी गांभीर्याने समाजस्थितीचे अवलोकन करायला सुरुवात केली. भारतीय स्त्रीयांची दयनीय अवस्था पाहून या सुधारकांनी समानता व सामाजिक न्यायाच्या दृष्टीने वाईट रुढी बदलण्याचे प्रयत्न — राजाराम मोहन रॉय, ईश्वर चंद विद्यासागर, म. फुले, स्वामी दयानंद, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे यांसारख्या समाजसुधारकांची अखंड परंपरा निर्माण झाली.

सुधारकांच्या या चळवळीने स्त्रीकडे माणूस म्हणून बघण्याची नवी दृष्टी दिली. म. जोतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य स्त्रीवादी साहित्यासमोरील एक प्रेरणास्थान होऊ शकते. ताराबाई शिंदे यांनी केलेली स्त्री–पुरुष तुलना, आगरकरंचे स्त्रीविषयक विचार, म. कर्वे यांचे स्त्रीविषयक कार्य, गांधीजींचा स्त्रीयांना सार्वजनिक जिवनात आणण्याचा प्रयत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले हिंदू कोड बिल इ. गोष्टींमध्ये मराठी स्त्रीवादी चळवळीच्या व स्त्रीवादी साहित्याच्या प्रेरणा दडलेल्या आहेत.

**प्रबोधन पर्वातील स्त्री :**

प्रबोधन पर्वातील स्त्रीला स्वतःमधल्या क्षमतांचे, शक्तीचे, स्वेच्छांचे, स्वतःच्या माणूसपणाचे नवे भान आले. आपल्या हक्क, कर्तव्यांचा विचार ती स्वतंत्रपणे करु लागली. १९२० ते १९४७ हा काळ स्त्रीयांच्या जागृतीला प्रेरक ठरला. म. गांधींच्या नेतृत्वाखालील स्वतंत्रलढ्यातील सहभाग, सुभाष बोस यांच्या राष्ट्रीय लष्करात असणारी स्त्रीयांची पलटण, हजारो दलित स्त्रीयांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्यता विरोधी लढ्यातील सहभाग, 'वारली' या आदिवासी जमात जागृतीसाठी गोदावरी परुळेकरांनी केलेले कार्य, उषाताई डांगे यांनी केलेल्या १९२९ च्या गिरण्यांच्या सार्वत्रिक संपाचे नेतृत्व, ताराबाई मोडक, अनुताई वाघ,

PDF Compressor Free Version



गंगुताई पटवर्धन यासारख्या स्त्रीयांचे स्त्री शिक्षणाचे कार्य या साऱ्यामुळे स्त्रीया सार्वजनिक जिवनात योगदान देऊ लागल्या. शिक्षणाने प्रगल्भ व बाह्यजगातील वावरामुळे निर्भय बनलेल्या स्त्रीया अन्यायविरुद्ध झगडण्यास तयार झाल्या.

१९४७ ला देशाला मिळालेल्या स्वातंत्र्यामुळे जिवनाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकिय, सामाजिक, आर्थिक व वैज्ञानिक अशा सर्वच क्षेत्रात भरीव प्रगती झाली.

स्त्री जिवनातील कक्षा वाढत असतानाच आपल्या स्वतंत्र अस्तित्वाची, व्यक्तीमत्वाची जाणीव होऊ लागलेल्या स्त्रीला संघटित होण्याची पर्यायाने स्त्री चळवळीची अपरिहार्यता जाणवली व आपल्या न्याय हक्कासाठी लढा देण्याची निकड स्त्रीयांना भासू लागली. यातून स्त्रीमुक्ती चळवळीचा उदय झाला.

आंतरराष्ट्रीय महिला वर्ष व महिला दशकामुळे स्त्रीयांच्या चळवळीला एक वैश्विक परिमाण लाभले. १९७४ मध्ये केंद्र सरकारने स्त्रियांच्या दर्जाची पाहणी करण्याकरिता श्रीमती फुलरेणु गुहा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या Towards Equality या स्त्रीयांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकणाऱ्या अहवालावरुन भारतीय स्त्रीयांची दयनीय अवस्था जनतेसमोर आली. व स्त्रीयांचे प्रश्न वेगळे असून त्यांचा स्वतंत्र विचार झाला पाहिजे याची जाणीव झाली. त्याचबरोबर समाजातील सर्व स्तरावरील (ग्रामीण, शहरी, विधवा, दलित, परित्यक्ता) स्त्रीयांचे प्रश्न भिन्न भिन्न असूनही त्यांचाही स्वतंत्रपणे विचार करण्याची निकड अधोरेखित केली.

. १९७५ नंतरच्या या स्त्रीविषयक परिवर्तनाला पुन्हा गती देण्याचे श्रेय पाश्चात्य स्त्रीवादाला जाते. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने भारतीय स्त्रीयांचा पाश्चात्य स्त्रीवादाशी व विचाराशी संपर्क आला व त्यामुळे स्त्री कार्यकर्त्यांची दृष्टी बदलली. समाजरचनेत स्त्रीला माणूस म्हणून अर्थपूर्ण स्थान प्राप्त व्हावे यासाठी जिवनाच्या सर्व क्षेत्रात संघर्षशील राहणारी 'स्त्रीवादी' ही विचारप्रणाली आपल्याकडील स्त्री चळवळीने स्वीकारली.

**स्त्रीमुक्ती संघटना :**

आज वेगवेगळे वैचारिक अधिष्ठान व उद्दिष्ट स्वीकारुन महिलांच्या विविध स्वयंसेवी संघटना महिलांसाठी कार्यरत आहेत.

**१) अखिल भारतीय महिला परिषद :**

१९२७ साली मार्गरेट कुझिन्स यांनी अखिल भारतीय महिला परिषदेची स्थापना केली व सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज उठविला. स्त्री शिक्षण, कायदे, मतदानाचा हक्क, देवदासी ची चाल अशा स्त्रीप्रश्नांना वाचा फोडणारी ही पहिली संघटना होती.

१९७५ नंतर उदयास आलेल्या 'नारी समता मंच', स्त्री आधार केंद्र, राज्य महिला आयोग, महाराष्ट्र महिला विद्यापीठ, स्त्रीमुक्ती संघटना, मजलीश मशवरा, जनवादी महिला संघटना, मेन अगेन्स्ट व्हायलन्स ॲन्ड ॲब्युज (मावा), महिला दक्षता समिती, विविध विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्रे, राजकीय पक्ष व चळवळीच्या महिला आघाड्या, स्त्री शिक्षण, स्त्री आरोग्य, स्त्रीयांचे बचत गट, महिला विकास इ. प्रश्नांवर काम करणाऱ्या बिगर शासकीय संघटना याद्वारे महाराष्ट्रातील स्त्री चळवळ संस्थात्मक रुप धारण करीत आहे.

**महाराष्ट्रातील काही प्रमुख संघटना :**

१) **सेहत** : गर्भपाताच्या प्रश्नावर संशोधन व जागृतीचे कार्य करीत आहे.

२) **मासूम** : महिलांसाठी बचत गट, हिंसेविरोधात कौटुंबिक सल्ला केंद्र, मुलामुलींसाठी 'रानपाखरे' भरारी गट, कृषीधन विकास प्रकल्प यासारखे उपक्रम राबविते.

३) **अलोचना** : स्त्री प्रश्नासंबंधी दस्ताऐवज, संदर्भ साहित्याचे संकलन, व संशोधन केंद्र यातून कार्यरत आहे.

४) **स्त्रीमुक्ती संघटना** : 'मुलगी झाली हो' च्या प्रयोगाने संपूर्ण महाराष्ट्र हलवून सोडला.

५) **स्वाधार** : स्त्रीयांना कौटुंबिक न्याय व कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषणविरुद्ध जोरदार आघाडी उघडली.

**६) मजलिश** : मुस्लिम स्त्रीयांचे प्रश्न व त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक कायद्याचा पाठपुरवठा करणे.

**७) महिला दक्षता समिती** : स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणे.

परित्यक्ता महिलांसाठी काम करणाऱ्या इतर संघटनामध्ये 'अनिता नेवसे' अध्यक्ष प्रगतशील महिला समिती (परांडा) व ग्रामीण महिलांच्या उन्नतीसाठी काम करणारे सुभाष मेंढापूरकर यांची 'सूत्र' ही संघटना, परित्यक्ता, एकट्या राहणाऱ्या, अविवाहित महिलांसाठी काम करते.

वरील संघटनांशिवाय परित्यक्ता महिलांच्या प्रश्नावर काम करणारी डाव्या विचारसरणीची – 'स्त्री मुक्ती संघर्ष चळवळ' श्रमिक मुक्ती दलाच्या नेतृत्वाखाली प. महाराष्ट्रात कार्यरत असून या संघटनेने केलेले कार्य विशेष उल्लेखनीय असल्याचे दिसते.

**स्त्री मुक्ती संघर्ष चळवळ पार्श्वभूमी :**

८ मार्च १९७५ ला 'आंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमित्त' पुणे या ठिकाणी स्त्री मुक्ती चळवळीत काम करणाऱ्या स्त्रीयांचा मोठा मेळावा आयाजित केला होता. कासेगांव (सांगली) येथून कॉ. इंदूताई पाटणकर, उषा निकम व इतर तीन स्त्रीयांना बरोबर घेऊन ताई पुणे येथे मेळाव्यासाठी हजर राहिल्या. ताई त्यावेळी समाजवादी पक्षात काम करीत होत्या. महाराष्ट्रातील डाव्या विचारांच्या अनेक संघटना या मेळाव्यात सामील झाल्या होत्या. स्त्रीयांची महाराष्ट्रातील 'केंद्रीय सुसूत्रता समिती' तयार झाली. छाया दातार, लिलाताई भोसले, शारदा साठे, निर्मला साठे अशा अनेक कार्यकर्त्या स्त्रीयांशी ताईंची ओळख झाली. या मेळाव्याने महाराष्ट्रातील स्त्रीयांच्या संघटनांना गती दिली. ठिकठिकाणी स्त्रीयांचे कृती गट संघटित होऊन स्त्रीयांमध्ये नवे नेतृत्व उभे राहू लागले. अभ्यास, लेखन, गाण्याचा विचार मांडणाऱ्या पुस्तिका अशा महाराष्ट्रातल्या स्त्रीमुक्ती चळवळीत नवे पर्व सुरु झाले.

पुण्याच्या या मेळाव्यातून ताई आणि गेल ऑम्वेट यांची भेट झाली. पुढे लिलावती भोसले, शारदा साठे, गेल ऑम्वेट कासेगांव येथे आल्या. गेल ऑम्वेट यांनी येथे जवळजवळ अर्धा तास मराठीतून भाषण केले. या भाषणाने उपस्थित स्त्रीया भारावून गेल्या. त्यानंतर इंदूताईंनी स्त्रीमुक्ती संघटना बांधून तिचे जाळे सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक गावांतून तयार झाले. त्यानंतर ताईंनी अनेक मेळावे, परिषदा घेतल्या. स्त्रीयांची अभ्यास शिबीरे तयार केली. परित्यक्ता स्त्रीयांचे लढाऊ संघटन तयार केले. अनेक लढे लढविले. हुंडाबळी, बलात्कार पिडित, तलाक पिडित, घटस्फोटितांचे प्रश्न शासनदरबारी मांडले. आई–वडील, नवऱ्याच्या मिळकतीत स्त्रीयांना वाटा मिळाला पाहिजे, जमिनीच्या ७/१२ वर स्त्रीचे नांव लागले पाहिजे, घरे बांधायला मदत मिळाली पाहिजे, त्यांना स्वतंत्र रेशनकार्ड मिळाले पाहिजे. त्यासाठी ताईंनी आग्रही लढे उभे केले.

समाजकारण – राजकारण, सहकार, शिक्षण इ. क्षेत्रात स्त्रीयांना सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे, स्त्रीयांना योग्य प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे, नोकरी व कामाच्या ठिकाणी, कुटुंब व समाजात देखील स्त्रीयांची पिळवणूक होता कामा नये. यासाठी ताईंनी काम केले. याशिवाय अंगात येणे, भूतबाधा, बिब्याची फुले पडणे, भीतीदायक स्वप्ने पडणे अशा मानसिक आजाराने पछाडलेल्या स्त्रीयांना योग्य वैद्यकीय मदत मिळाली पाहिजे त्यासाठी कॉ. ताईंनी प्रयत्न केले. बुवा, मांत्रीक, गंडेदोरे वाले, भविष्य सांगणारे, कर्मकांड करणारे लोक आजही ताईंचे नाव घेताच घाबरतात.

स्त्रीमुक्ती हा श्रमुदच्या चळवळीतील प्राधान्य क्रमाचा लढा राहिलेला आहे. १९७२ च्या दुष्काळामध्ये रोजगार हमीच्या कामावर येणाऱ्या स्त्रीयांमध्ये परित्यक्ता स्त्रीयांची संख्या खूप मोठी होती. पोटांचे प्रश्न सर्वांचेच होते मात्र या परित्यक्ता स्त्रीयांचे प्रश्न सामाजिक प्रतिष्ठा आणि हक्काचाही होता. १९७५ साली (मागोवा) विसर्जित झाल्यानंतर श्रमुदच्या स्थापनेपूर्वी भारत पाटणकर व त्यांचे सहकारी यांचे शहादा, तळोदा, नंदूरबार भागात स्थानिक पातळीवर माठी स्त्रीमुक्ती संघटना कार्यरत होती. त्यावेळी त्यांनी त्या भागातील स्त्रीयांच्या प्रश्नासाठी

लढे दिले व पुढे १९८३ ला 'स्त्रीमुक्ती संघर्ष चळवळ' या नावाने श्रमुद अंतर्गत तिचे कार्य सुरु झाले.

**या चळवळीचे प्रमुख तीन पैलू आहेत :**

१) समान कामाला समान दाम – स्त्री–पुरुष समानता व कामाच्या ठिकाणी पाळणाघर व दायी या दोन्हींची सोय.

२) परित्यक्ता स्त्रीचा हक्क म्हणून – एकटी स्त्री कुटुंबप्रमुख म्हणून तिला हक्क हवेत व तिचे नाव रेकॉर्डला लावले पाहिजे आणि विशेष बाब म्हणून त्यांना घर बांधण्यासाठी प्लॉट्स व प्लॉट्सजवळ भाजीपाला करण्यासाठी मोकळी जमीन मिळावी. त्यांच्या मुलांना वसतीगृहात मोफत प्रवेश मिळाला पाहिजे.

३) प्रॉपर्टीमध्ये समान हिस्सा मिळाला पाहिजे आणि जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर पुरुषांबरोबर स्त्रीचेही नाव लागले पाहिजे.

परित्यक्ता स्त्रीचे पालक म्हणून नाव लागणे व घरासाठी प्लॉट्स या दोन गोष्टींमध्ये चळवळीला यश मिळालेले दिसते. चार वर्षापूर्वी हा भाग कायद्यामध्ये आला आहे. याचा लाभ धरणग्रस्त महिलांनाही झालेला दिसून येतो.

**स्त्रीमुक्ती संघर्ष चळवळीचे ठळक लढे :**

श्रमुदच्या नेतृत्वाखाली स्त्रीमुक्ती संघर्ष चळवळीची पहिली परिषद १९८५ ला पार पडली पुढे १९८८ मध्ये विटा ता. खानापूर (सांगली) येथे स्वातंत्र्य सैनिक इंदूताई पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली स्त्रीमुक्ती चळवळीचा पहिला मेळावा झाला. या मेळाव्यात पुढील मागण्या करण्यात आल्या. घरासाठी दोन गुंठे जागा, स्वतंत्र शिधा पत्रिका, पोटगीचे दावे चालविण्यासाठी कायद्याची मोफत मदत इ. "हिरवी धरती, स्त्री शक्ती मानवमुक्तीसाठी – चला बाई चला एकजुट करा स्त्रीमुक्तीचा देऊ लढा" अशी स्फूर्तिगीते चळवळीची प्रेरणागीते होती.

१९८९ मध्ये सांगली व सातारा जिल्ह्यातील ३२ गावातील ३०५ महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलने केली. त्याचा परिणाम म्हणून सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील जवळपास ६०० महिलांना शिधापत्रिका मिळण्यास मदत झाली. तसेच पोटगीच्या दाव्यासंदर्भात मोफत कायदेविषयक सल्ला देण्याची मागणी मान्य झाली व काही ग्रामपंचायतींनी गावठाणातील घरांसाठी जागा देण्याचे मान्य केले.

**हुबाळवाडीचा लढा (बहे – ता. वाळवा) :**

"३१ मार्च १९९७ रोजी महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर, पुणे, मुंबई येथील स्त्रीमुक्ती संघटनांच्या कार्यकर्त्यांनी एकत्र आंदोलन करून हुबाळवाडीत गावठाणातील जागेसाठी कब्जा आंदोलन करुन त्या जागेवर भूमीपूजन केले. कॉ. इंदूताई पाटणकर व कमलाताई पाटील यांनी या लढ्याचे नेतृत्व केले. पुढे १९९९ ला स्त्रीमुक्ती संघर्ष चळवळीने हा खटला स्वत: चालविण्याचे ठरविले व नामांकित वकील मिहीर देसाई यांनी महिलांचे वकीलपत्र घेतले. तब्बल ११ वर्षानंतर २००३ मध्ये खटल्याचा निकाल महिलांच्या बाजूने लागला व ती जागा ताब्यात मिळून घरे पूर्ण झाली. या लढ्यातील अग्रणी 'कमला पाटील' यांच्या स्मृती जागविण्यासाठी त्या परिसराचे 'कमलानगर' असे नामकरण झाले. ५०,००० रु. खर्चाची उतरत्या छपराची २०० चौ. फु. ही घरकुले आहेत. किमान ५० वर्षे या घरांना धोका नाही. पुणे येथील 'सोपेकॉम' या संस्थेनेपर्यावरण पूरक अशी घरकुले उभारली. मुंबई येथील 'बाल्मर अ‍ॅन्ड लॉरी' कंपनीने या घरबांधणीसाठी सहकार्य केले.

राज्यात ६ लाखांहून अधिक परित्यक्तांची संख्या असून कोणत्याही शुल्लक कारणांवरुन नवरा बायकोला हाकलून देतो, तिला बेघर बनवितो, स्त्रीला प्रतिष्ठा हवी, ती स्वावलंबी हवी अशा ध्येयापर्यंत जाता येण्यासाठी तीला स्वतंत्र घरकूल हवं." (दै. सकाळ ३०.८. २०१०–हुबाळवाडीचा लढा.)कमलानगर हुबाळवाडी (बहे) गावी प्रत्यक्षघरकुल लाभार्थी महिलांची संख्या २४ आहे

PDF Compressor Free Version

(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

. सांगली जिल्ह्यातील परित्यक्ता स्त्रीयांच्या मागण्यांसंदर्भात १९८८–८९ पासून तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी परित्यक्ता म्हणून जिवन जगणाऱ्या स्त्रीयांच्या समस्या सोडविण्यासाठी 'स्त्रीमुक्ती संघर्ष चळवळीच्या' प्रयत्नामुळे १६ फेब्रु. १९८९ रोजी जिल्हाधिकारी श्री श्रीधर जोशी यांनी काही महत्वपूर्ण निर्णय घेऊन त्यांनी अंमलबजावणी सुरु केली.

**निर्णय:**

१) दारिद्र्य रेषेखालील यादीत परित्यक्तांची स्वतंत्र यादी करुन त्यांचा बेघर म्हणून समावेश – दारिद्र्य रेषेखालील सर्व सवलती देणे.

२) पालक म्हणून परित्यक्ता आईची सही शाळेच्या कामासाठी ग्राह्य धरली जाईल.

३) गावात घर बांधणीसाठी दोन गुंठेचा प्लॉट व गरज पडल्यास गावठाणात वाढ.

४) स्वतंत्र कुटुंब म्हणून रेशनकार्ड देण्यात येईल.

५) स्वयंरोजगार करण्यास तयार असल्यास तारण न घेता बँक कर्ज.

पुढे २८ सप्टें. १९९३ मध्ये जिल्हाधिकारी सुमित ओक यांनी परित्यक्ता स्त्रीयांच्या पुनर्वसनासाठी प्लॉट/गायरान ची गावनिहाय यादी तयार करण्याचे आदेश दिले.

| गांव | १) वांगी | २) रामापूर | बलवडी | आळसंद | वाझर | हुबाळवाडी |
|---|---|---|---|---|---|---|
| परित्यक्ता संख्या | ३९ | २२ | १६ | ४० | २२ | २३ |

तसेच १०/०२/२००५ रोजी जिल्हाधिकारी बैठकीत ठराव झाले. १५/१२/२००५ रोजी परित्यक्ता स्त्रीयांना भूखंड मंजूर करण्याबाबत मा. अप्पर जिल्हाधिकारी सांगली यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, श्रीमती इंदूताई पाटणकर उपस्थित होत्या.

त्या बैठकीतील निर्णय पुढिलप्रमाणे :

| गांव | एकुण मागणी अर्ज | पात्र अर्ज | अपात्र अर्ज | शेरा |
|---|---|---|---|---|
| रामापूर | २७ | २० | ०७ | जाने. २००६ पर्यंत जमीन देण सर्वे नं. ६०/१ |
| वांगी | ३७ | २६ | ०७ | ग. नं. ५०६ अ. ३० जाने. २००७ पर्यंत प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश. |
| आळसंद | ४२ | २७ | १५ | ग. नं. ६६८ जमीन शासकीय १५.१. २००६ प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश. |
| वाझर | ०७ | ०५ | ०२ | ग. नं. २८३ व गायरान ६ हे. १५.०१. २००६ पर्यंत वाटप पूर्ण करण्याचे आदेश. |
| बलवडी भा. | २९ | २२ | ०७ | मौजे बलवडी जमिन उपलब्धीबाबत. |

ग्रामपंचायतीशी चर्चा करुन जमिन उपलब्ध न झाल्यास नजीकच्या गावी त्यासाठी प्रयत्न करण्याचे आदेश बैठकीत देण्यात आले. (संदर्भ १५/१२/२००५ बैठकीचे इतिवृत्त.)

जिल्हाधिकारी सांगली व स्त्रीमुक्ती संघर्ष चळवळ यांचे बैठकीत वरील निर्णयाची घोषणा झाली पण तीही अडथळ्यामुळे. बहे (हुबाळवाडी वगळता) इतर गावांमध्ये वरील निर्णयांची प्रक्रिया सुरु असून लाभार्थींना अंतीम लाभ मिळणे बाकी असल्याचे दिसून येते. दि. २८ मार्च

PDF Compressor Free Version



२००९ मध्ये सातारा या ठिकाणी धरणग्रस्त स्त्रीयांसाठी श्रमुदने निर्धार मेळाव्याचे आयोजन करुन त्यात पुढील प्रश्नांची सोडवणुक केल्याची घोषणा केली.

• धरणग्रस्त महिलांच्या बचतगटांना अनुदान. • धरणग्रस्तांची नोंद दारिद्र्य रेषेखाली व्हावे.

• लेकी–वारसांना किमान दोन एकर जमिन मिळावी. • कुटुंबात फक्त मुलीच असतील तर २००५ चा कायदा दुरुस्त करुन वारसा हक्क मिळावा.

"२००५ साली कासेगांव येथे स्त्रियांचा प्रचंड मेळावा होऊन चळवळीला गती देण्याचा प्रयत्न झाला पण संघटनात्मक अडचणीमुळे पुन्हा चळवळीच्या कामात खंड पडलेला दिसून येतो." (संदर्भ – गोठणे – जैतापूर ता. शिराळे – वार्षिक अधिवेशन डिसेंबर २०१२ ठराव कृ. ०८)

श्रमिक मुक्ती दलाच्या स्त्रीमुक्ती संघर्ष चळवळीला गती देऊन लढे व लढ्यांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी ८ मार्च २०१३ स्त्रीमुक्ती दिनानिमित्त कासेगांव या ठिकाणीस्त्रीयांचा मेळावा पार पडला त्यातील महत्वाचे ठराव पुढीलप्रमाणे :

१) शिक्षणाच्या अत्युच्च पातळीपर्यंत स्त्रीयांना विना अडथळा पुढे जाता यावे यासाठी सर्वात प्राथमिक पातळीपासून वरच्या पातळीपर्यंत मोफत शिक्षण. सर्व पातळ्यावर कष्टकरी, मुली, तरुणी / स्त्रीयांना ५०%आरक्षण. या आरक्षणात अनुसूचीत जाती जमाती, अन्य मागासवर्गीय व प्रकल्पग्रस्त मुली / स्त्रीयांना अग्रक्रमाने पोट आरक्षण मिळावे.

२) शेतमजूर, कामगार, शेतकरी, कष्टकरी इ. प्रकारच्या उपजिविकांमध्ये उत्पादन कार्य करणाऱ्या आणि घराघरांत राबणाऱ्या स्त्रीयांना कामाच्या ठिकाणी दुजाभाव वागणुकीविरुद्ध – संरक्षणाची कायदेशीर तरतुद तसेच स्त्रीयांना मजूरी, नोकरीसाठी समान दाम ची तरतुद असावी.

३) एकेकाळी स्त्रीमुक्ती संघर्ष चळवळीने महाराष्ट्रात परित्यक्ता स्त्रीयांच्या स्वातंत्र्यासाठी लढा उभारण्यात पुढाकार घेतला होता. आता पुन्हा एकदा परित्यक्तांच्या स्वातंत्र्यासाठी त्यांच्या मुलांसह कुटुंबाच्या विकासासाठी जोरदार चळवळ उभारण्याचा ठराव हा मेळावा घेत आहे. परित्यक्तांना मिळालेल्या हक्कांची अंमलबजावणी व नव्या हक्कांसाठी लढा उभारणे.

४) देशात व राज्यात स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचारात वाढझालेली आहे. सरकार व पोलीस विभाग यंत्रणा स्त्रीयांना सुरक्षित ठेवण्यास मदत करु शकत नाही, गुंडगिरी वाढली आहे, त्यांना न्यायव्यवस्थेकडून न्याय मिळू शकत नाही. पारंपारिक शेती जिवनात लागणारी हत्यारेच स्त्रीयांनी स्वत:बरोबर बाळगून हल्ला होण्याची परिस्थिती असेल अशावेळी तात्काळ एकत्र जमून हल्ला मोडून काढण्याची, यंत्रणा उभी केली पाहिजे. हा मेळावा स्वत:चे संरक्षण स्वत: करावे यासाठी यंत्रणा उभी करण्याचा ठराव पास करीत आहे.

५) महाराष्ट्रातील विविध जिल्हे व तालुक्यातून मेळाव्याला आलेल्या प्रतिनिधी म्हणून – स्त्री मुक्ती संघर्ष चळवळ या श्रमुदच्या स्त्री आघाडीची स्वतंत्र कार्यकारणी येत्या महिन्यात संघटित करुन कामकाज सुरु करण्याचा हा मेळावा निर्णय घेत आहे. (संदर्भ ८ मार्च २०१३ स्त्रियांचा मेळावा कासेगांव.)

आज रोजी स्त्रीयांच्या स्वसंरक्षणाचा जो प्रश्न तयार झाला आहे. स्त्रीयांवर अत्याचार, हल्ले विरोधी लागोपाठ सातारा, सांगली, जिल्ह्यामध्ये संघर्ष झाले. वरील मेळाव्यात शेवटी – हातामध्ये कोयते घेऊन महिलांनी गावातून मिरवणूक काढली व सरकारला इशारा देण्यात आला. तुम्ही जर स्त्री संरक्षणाची व्यवस्था व्यवस्थित केली नाही तर आम्हीच आमचे संरक्षण या कोयत्याने करु. २०१३ मध्ये असाच मोर्चा सातारा जिल्ह्यात झाला. या मेळाव्यानंतर भ्याड हल्ले स्त्रीयांवर झाले नसल्याचे संघटनेचे म्हणने आहे.

विविध नातेसंबंधात महिलांचे हक्क या लेखात ॲड. रघुनाथ रातंजनकर म्हणाले – इस्टेटीच्या संदर्भात मुलींना व एकुणच महिलांना हक्क न देण्याची परंपरा प्राचीन काळापासून सर्वत्र चालत आलेली होती. हिंदू समाजाच्या दृष्टीने सुदैवाने उशीरा का होईना या पद्धतीत क्रमश: बदल होत गेले. वडिलार्जित इस्टेटीत मुलग्यांना 'कोपार्सनर' म्हणजे जन्मसिद्ध हिस्सेदार असा दर्जा होता व आहे त्यामुळे मुलग्यांना जन्मत: वडिलांच्या इतकाच हिस्सा मिळतो. मुलीस तसा दर्जा

नव्हता. तिचे पालनपोषण करुन तिचा विवाह करुन देणे एवढीच फक्त कुटुंबाची जबाबदारी होती.

१९५६ च्या वारसा कायद्याने प्रथमच तिला थोडासा अधिकार दिला. मात्र महाराष्ट्र सरकारने या कायद्यात दुरुस्ती केली व २२ जून १९९४ पूर्वी लग्न झालेल्या मुलींना वगळून इतर मुलींना मुलग्यांप्रमाणेच 'कोपार्सनर' चा दर्जा देऊन समान पातळीवर आणले. केंद्रसरकारने कायद्यात २००५ ची दुरुस्ती करुन सर्वच मुलींना मुलग्यांइतकेच अधिकार दिले.

मुलींना याप्रमाणे वारसा हक्काने मिळणारी इस्टेट अपूरी असल्यास विधवा किंवा परित्यक्ता निराधार मुलीस आईवडिलांच्या इस्टेटीतून गरजेनुसार पोटगी मिळावयास हवी तशी तरतूद सध्या नाही. त्यासाठीही कायद्यात सुधारणा होणे गरजेचे आहे. (ॲड. रघुनाथ रातंजनकर – १८/०३/२००८ सकाळ)

विधवा किंवा परित्यक्ता निराधार बहिणीस सुस्थितीतील भावाकडून पोटगीचा तरी हक्क मिळणे गरजेचे आहे. सध्या तसा हक्क नसल्याने श्रीमंत भावांच्या बहिणी मोलमजूरीचे जिणे जगत असल्याची अनेक दुर्दैवी उदाहरणे दिसतात. एकूणच स्त्री मुक्ती संघर्ष चळवळीने समाजातील वंचित, शोषित,परित्यक्ता, धरणग्रस्त महिलाप्रश्नी केलेले कार्य उल्लेखनीय आहे मात्र या चळवळीचे खंबीर नेतृत्व क्रांतीविरांगना इंदूताई पाटणकर यांचे १४ जुलै २०१७ मध्ये वार्धक्याने झालेले निधन या चळवळीत पोकळी निर्माण करणारे आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये.

दरवर्षी ५ सप्टेंबरला कराड येथे श्रमुद चा मेळावा आयोजित केला जातो. त्यामध्ये चळवळीचे धोरण व कार्यक्रम ठरवला जातो व त्या अनुषंगाने त्याची अंमलबजावणी होताना दिसते.

**निष्कर्ष :**

१) स्त्री मुक्ती संघर्ष चळवळीवर डाव्या विचारसरणीचा प्रभाव असून ती समाजातील वंचित, शोषित,परित्यक्ता, धरणग्रस्त महिलांच्या प्रश्नांसाठी कार्य करताना दिसून येते.

२) प्रॉपर्टीमध्ये भावाच्या बरोबरीने बहिणींना स्त्री वारस म्हणून समान हक्क या लढ्यात संघटनेला यश प्राप्त झालेले दिसते.

३) हुबाळवाडी (बहे) ता. वाळवा येथे परित्यक्तांना स्वत:च्या मालकीची घरे मिळवून देण्यात संघटना यशस्वी झाली असून रामापूर, वांगी, बलवडी, आळसंद, वाझर जि. सांगली येथील परित्यक्तांच्या पुर्नवसनाचे काम प्रगतीपथावर असल्याचे दिसून येते.

४) परित्यक्ता स्त्रीयांचे पालक म्हणून रेकॉर्डला नाव लागणे व घरासाठी प्लॉट्स या दोन्ही गोष्टींमध्ये संघटनेला यश प्राप्त झालेले दिसते.

५) वर्गव्यवस्था, जातीव्यवस्था व कुटूंबव्यवस्था या तिन्ही प्रकारच्या शोषनातून स्त्रीमुक्ती हीच या चळवळीची मध्यवर्ती भूमिका असून शासन पातळीवर या चळवळीच्या लढ्याची दखल घेतल्याचे दिसून येते.

**संदर्भसूची :**

१) पाटणकर भारत (संकलन) : श्रमिक मुक्ती दल मूलभूत भूमीकेचा जाहिरनामा, प्रकाशक : ॲड. कृष्णा पाटील, २००९.

२) म्हमाणे अनिल, संतोष गोटल (संपादक) – मानवमुक्तीसाठी समग्र : भारत पाटणकर खंड १ निर्मिती संवाद कोल्हापूर.

३) पाटील भारती – समाज आणि राजकारण, हर्मिस प्रकाशन,पुणे, २०१४.

४) माने रचना – स्त्रीवाद संकल्पना आणि स्वरुप, अक्षरप्रकाशन, कोल्हापूर, २०१३, पृ. १५९.

५) पाटील उषा –परित्यक्ता– व्यथा आणि वास्तव, अक्षरदीप प्रकाशन.

६) नानिवडीकर मेधा – महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा, प्रतिमा प्रकाशन,पुणे, २००६.

७) गुरव बाबुराव – (महिला विशेषांक) क्रांतिवीरांगना इंदूताई पाटणकर, प्रबोधन प्रकाशन ज्योती मार्च २००१.

2019-20 ✓

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR



# DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE

*(Golden Jubilee Year 2019-20)*

&

# CENTER OF NEHRU STUDIES

*Jointly Organized*

## *Online National Seminar (Webinar)*

&

## *26th SHIVAJI UNIVERSITY POLITICAL SCIENCE ASSOCIATION CONFERENCE*

*On*

## *"New Social Movements in Maharashtra (1980-2020)"*

# CERTIFICATE

This is to certify that Mr./Mrs./Prof./Dr. SURESH GANGARAM KUMBHAR of R.S.B.MAHAVIDYALAYA AUNDH (SATARA) has Chaired the Session/Present as a Resource Person/ Participated / Presented a research Paper entitled स्त्रीमुक्ती संघर्ष चळवळ in the National Seminar (Webinar) held at Department of Political Science & Nehru Study Center, Shivaji University, Kolhapur on 10th May, 2020.

Prof.Dr. Ravindra Bhanage,
Head, Department of Political Science, SUK
Presedent, Shivaji University Political Science Association

PDF Compressor Free Version